मुंबई । बुधवार २१ मे २०२५
आपलं महानगर

(पान १


## मुंबईत शौचालयांची कमतरता

त्याचप्रमाणे, सन २०२४ मधील माहितीनुसार मुंबईत ७५२ पुरुषामागे एक शौचकूप तर १८२० महिलांमागे एक शौचकूप व्यवस्था असल्याची माहिती प्रजा फाऊंडेशनने समोर आणली आहे. तसेच, २०२३ च्या माहितीनुसार, मुंबईत एका सामुदायिक शौचालयाचा ८६ पुरुष तर महिला करीत आहेत. जेव्हा की, स्वच्छ भारत अभियानाच्या मापदंडानुसार, एका सामुदायिक शौचालयाचा वापर किमान ३५ पुरुषांनी तर २५ महिलांनी करणे अपेक्षित असल्याचे प्रजा फाऊंडेशनकडून सांगण्यात आले. मुंबई महापालिकेने जास्तीत जास्त अथवा पुरेशी शौचालयांची बांधणी करून त्यामध्ये आवश्यक शौचकूप बसविण्याची व्यवस्था लवकरात लवकर करावी. त्यामुळे मुंबईकर महिला व पुरुष मंडळी यांची शौचालयबाबतची गैरसोय दूर होण्यास मोठी मदत होईल, अशी सूचना प्रजा फाऊंडेशन मार्फत करण्यात आली आहे.

# मुंबईत शौचालयांची कमतरता

## प्रजा फाऊंडेशनच्या अहवालात पोलखोल

**प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा**



**मुंबई :** मुंबई शहर हागणदारीमुक्त झाल्याचा दावा मुंबई महापालिकेकडून अलीकडेच करण्यात आला होता. मात्र प्रजा फाऊंडेशन या संस्थेने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या नागरी सेवासुविधा बाबतच्या अहवालात मुंबईतील शौचालयांची व तेथील सेवासुविधांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याची पोलखोल केली आहे. मुंबईत वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत शौचालयांची व शौचकूपांची संख्या कमी आहे. त्यामुळे २०२४ मधील माहितीनुसार, महापालिकेच्या ए आणि बी वॉर्डच्या शौचालयांमधील दर ४ सार्वजनिक शौचकुपांपैकी ३ शौचकूपांचा वापर पुरुषांकडून तर फक्त एकाचा वापर महिलांकडून केला जात असल्याची विदारक माहिती समोर आली आहे. पान २

### ६०-६९ टक्के शौचालयात पाणी, वीजदेखील नाही

आणखीन धक्कादायक बाब म्हणजे मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरात २०२३ च्या उपलब्ध माहितीनुसार, ६,८०० सामुदायिक शौचालयांपैकी ६९ टक्के(६,५९१ पैकी ४,५१८) शौचालयांमध्ये अत्यावश्यक पाण्याची जोडणी नाही. तसेच, ६० टक्के (६,६७६ पैकी ४,०१०) शौचालयांमध्ये अत्यावश्यक विजेची जोडणी नाही. लोकांना रात्रीच्या वेळी विजेशिवाय कसेतरी नैसर्गिक विधी उरकावा लागत असल्याची गंभीर बाब सदर अहवालातून समोर आणण्यात आली आहे.